MHRT050008802023

प्रपत्र - ३२

भाग 'अ'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i))

**खेड येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.२)**
**यांचे न्यायालयात**
**(पिठासिन अधिकारी डी. जी. म्हसके)**
**(जाहीर दिनांक १०.०३.२०२६)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५३३/२०२३**
(गु.र. क्र.१३७/२०२३ रा.उ.शु. खेड विभाग)
**निशाणी क्र. ६ लगत**

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | | **महाराष्ट्र सरकार**<br>तर्फे निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, खेड विभाग, जि. रत्नागिरी. |
| **प्रतिनिधीत्व** | | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीम. ए. ए. सोलंकी** |
| **आरोपी** | १. | **दिनेश महिपत जाबरे**<br>वय - ४७ वर्षे, व्यवसाय- शेती,<br>रा. मु. पो. आंबये, जाबरेवाडी, ता.खेड, जि.रत्नागिरी. |
| **प्रतिनिधीत्व** | | **आरोपीकरीता वकील श्रीम. ए. एस. मोरे** |

भाग 'ब'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ०९.०७.२०२३ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | ०९.०७.२०२३ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | २९.०९.२०२३ |
| आरोपीचे प्रतिकथन नोंदविल्याची तारीख | २८.०३.२०२४ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | १०.०२.२०२५ |
| निकालाची आरक्षीत तारीख | निरंक |
| निकालाची तारीख | १०.०३.२०२६ |

| | |
|---|---|
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | लागू नाही. |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी क्रमांक | आरोपींचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौप्रसं कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | दिनेश महिपत जाबरे | दि.०९.०७.२०२३ रोजी सी. आर. पी. सी. १९७३ चे कलम ४१अ(१) प्रमाणे नोटिस दिली. | २८.०३.२०२४ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे सुधारित अध्यादेश २००५ चे कलम ६५ (ई) प्रमाणे | निर्दोष मुक्त केले. | लागु नाही | निर्दोष मुक्त केल्यामुळे लागू होत नाही. |

भाग 'क'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii))

## सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. सरकारी

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.१ | इम्रान इलायत पेडेकर | पंच साक्षीदार |

### ब. बचावाचे साक्षीदार

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| नाही. | | |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| नाही. | | |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

### अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ११ | पंचनाम्यावरील साक्षीदार यांची सही |

### ब. बचाव

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

क. न्यायालयीन निशाण्या

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | नाही. | |

मुद्देमाल

| क्रमांक | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | -- | एक कॅन पूर्णपणे भरलेला व दुसरे सुमारे २७ लि. गावठी हातभट्टी दारूने भरलेला कॅन असे एकूण दोन ३५ लि. मापाचे प्लास्टीक कॅन. |
| २. | -- | सात काचेची ग्लासे. |
| ३. | -- | तीन प्लास्टीक मग. |
| | (वर नमुद मुद्देमाल न्यायालयात हजर केलेला नाही.) | |

# न्यायनिर्णय

## (जाहीर दिनांक १०.०३.२०२६)

प्रस्तुतचा खटला हा आरोपी विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यासाठी चालविण्यात आला.

## ०२. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत पुढीलप्रमाणे-

दिनांक ०९.०७.२०२३ रोजी १५.१५ वाजताचे सुमारास मौजे आंबये मुस्लीम मोहल्ला वस्तीचे पूर्वेस कॅनॉलच्या कडेला आंब्याच्या झाडाखाली एका तात्पुरत्या झोपडीत, ता. खेड, जि. रत्नागिरी येथे आरोपी हा विनापरवाना गैरकायदा गावठी हातभट्टीची दारू विक्री करीता त्याचे कब्जात बाळगले स्थितीत मिळून आला. त्यामुळे फिर्यादी यांनी त्याचेविरुध्द फिर्याद दाखल केली.

०३. सदर फिर्यादीवरून आरोपी विरुध्द गु.र.नं.१३७/२०२३ नोंदविण्यात आला. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी सदर गुन्ह्याचे तपासकाम केले. त्यांनी तपासकामी साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले. घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला.

तपासाअंती आरोपी विरुध्द पुरावा मिळून आल्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) प्रमाणे दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीस महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) या गुन्ह्याचा तपशिल (नि.६) वाचून व समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा नाकबुल करून संपरिक्षेची मागणी केली. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने या न्यायानिर्णयाच्या 'भाग क' मधील नमुद साक्षी पुराव्यांचा आधार घेतला आहे. यापलीकडे अभियोग पक्षास पुरेशी संधी देवूनही त्यांना उर्वरीत साक्षीदारांना न्यायालयात उपस्थित ठेवण्यात यश न आल्याने त्यांचा पुरावा बंद करण्यात आला. अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरून आरोपी विरुध्द गुन्हादर्शक पुरावा आढळून न आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ नुसार निवेदन वगळण्यात आले.

**०५.** दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला. सदर प्रकरणाच्या अंतिम न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे प्रस्थापित केले आहेत. सदरचे मुद्दे व त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक ०९.०७.२०२३ रोजी १५.१५ वाजताचे सुमारास मौजे आंबये मुस्लीम मोहल्ला वस्तीचे पूर्वेस कॅनॉलच्या कडेला आंब्याच्या झाडाखाली एका तात्पुरत्या झोपडीत, ता. खेड, जि. रत्नागिरी येथे आरोपी हा विनापरवाना गैरकायदा गावठी हातभट्टीची दारू विक्री करीता त्याचे कब्जात बाळगले स्थितीत मिळून आला असल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | अंतिम आदेश ? | निर्दोष मुक्त केले. |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र. १ बाबत –**

**०६.** महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षाने आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमातील नियमांचे उल्लंघन करून देशी–विदेशी दारू ही विक्री करण्याकरिता ताब्यात बाळगली हे शाबीत करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये आरोपीने गुन्हा केला आहे हे अभियोग पक्षाने शाबीत केले किंवा कसे हे तपासण्यासाठी अभियोग पक्षाने याकामी सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन होणे आवश्यक आहे.

**०७.** सदर प्रकरणात अभियोग पक्षाने पंच साक्षीदार इम्रान (सा.क्र.१) यांना तपासले असता त्यांनी अभियोग पक्षास मदत होईल असे कोणतेही कथन केले नाही. अभियोग पक्षाने त्यांना फितूर घोषित करून उलटतपासाप्रमाणे प्रश्न विचारले. त्यांचेकडून घटनास्थळ जप्ती पंचनामा सिध्द केला असला तरी सदर प्रकरणात मुळात आरोपीच्या ताब्यातुन दारू मिळून आली हे सिध्द करण्याकरिता रासायनिक विश्लेषणाचा अहवाल याकामी पटलावर आणणे आवश्यक होते परंतु याकामी अभियोग पक्षाने रासायनिक पृथ्थकरणाचा अहवाल दाखल केला नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यात दारू मिळून आली हीच बाब शाबित झालेली नाही.

**०८.** आरोपीकडे दारु निर्मिती करणे, दारू बाळगणे व ती विक्री करण्याबाबत परवाना, पास, प्राधिकारपत्र आहे किंवा कसे याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा

अभियोग पक्षाने दाखल केलेला नाही. त्यामुळे अभियोग पक्षाच्या कथनावर संशय बळावतो.

**०९.** एकंदरीत, वर नमुद विवेचनाअंती आरोपी विरुध्द गुन्हा शाबीत होण्याकरीता सबळ पुरावा अभियोग पक्षातर्फे पटलावर आणणे गरजेचे होते परंतु अभियोग पक्षास त्यामध्ये अपयश आलेले आहे. आरोपीने गुन्हा केला असल्याचे शाबीत झाले असे म्हणता येणार नाही. यास्तव मुद्दा क्र.१ बाबत माझे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ बाबत** –

**१०.** प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा केल्याचे सिध्द करण्यात अभियोग पक्ष अपयशी ठरल्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्ततेस पात्र आहे.

**११.** सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल दारु यापुर्वी नियमाप्रमाणे विनाश केली नसेल तर सदर जप्त मुद्देमाल दारु नाश करणेकरीता अपिल कालावधी संपल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क, रत्नागिरी यांचे ताब्यात देणे योग्य होईल. वर नमुद कारणास्तव मुद्दा क्र. २ च्या अनुषंगाने, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपीची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) च्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तीक जातमुचलका व जामिनदाराचे बंधपत्र रद्द करण्यात

येतात.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम रु.५,०००/– चा वैयक्तीक बंधपत्र व तेवढ्याच रक्कमेचा जामिनदाराचे बंधपत्र सात दिवसांचे आत सादर करावे.

४. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल दारु यापुर्वी नियमाप्रमाणे विनाश केली नसेल तर सदर जप्त मुद्देमाल दारु नाश करणेकरीता अपिल कालावधी संपल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क, रत्नागिरी यांचे ताब्यात देण्यात यावा.

(येणेप्रमाणे न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात येतो.)

Digitally signed by MHASKE DADA GOPINATH
Date: 2026.03.11 18:36:31 +0530

**दिनांक – १०.०३.२०२६**

**(डी. जी. म्हस्के)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२) खेड, ता. खेड**

# CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | S.C.C. No.533-2023 |
| I affirm that the contents of this pdf file Judgment/order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Clerk | : | Shri. J.D.Ambekar |
| Court Name | : | D.G.Mhaske<br>2nd Jt. CJJD & JMFC, Khed |
| Date of Decision | : | 10.03.2026 |
| Judgment /Order signed by Presiding Officer on | : | 10.03.2026 |
| Judgment /Order uploaded on | : | 11.03.2026 |